. ग्रं. सं. ठाणे
काव्य
२५४९

# गौतमबुद्ध



REFBK-0025196
REFBK-0025196

ह. रा. इनामदार

संदर्भ काव्य
२५४९
२५१९६

ह. रा. इनामदार
इनामदार वाडा,
महर्षी कर्वे रोड,
डोंबिवली (प), 421 202

REFBK-0025196

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५४९
२५१९६

# गौतमबुद्ध

## व

## इतर कविता

-: लेखक :-

❀ ह. रा. इनामदार ❀

☆

-: प्रस्तावना :-

प्रा. डॉ. गो. पं. कुलकर्णी

☆

डोंबिवली साहित्य सभा

☆

**कविता प्रकाशन**

कोपर रोड, डोंबिवली (प.)

प्रकाशिका : सौ. सुनीता शंभुनाथ कहाळेकर
१४ ब, छाया, कोपर रोड,
डोंबिवली (प.) ४२१ २०२.

मुद्रक : सौ. सुनीता शंभूनाथ कहाळेकर

मुद्रणस्थळ : गुरुकृपा मुद्रणालय,
कोपर रोड, डोंबिवली (प) ४२१ २०२.

सर्व हक्क लेखकाधीन.

किंमत सात रुपये फक्त

प्रथमावृत्ती.

## -: अर्पण पत्रिका :-

अर्पिली तुला ही काव्य सुमांची माला
मूर्तीच स्फूर्तिची नटविशी कविता बाला
हा स्नेह सुगंधीत अंतरांत परिमळला
आनंद नादला तुजसाठी मोहरला

# -: ऋण निर्देश :-

कै. बाबासाहेब आंबेडकरानी बुद्धधर्माचा स्वीकार कां केला. हे कुतूहल मला स्वस्थ बसू देत नव्हते. त्यामुळे मी बुद्धचरित्राचा आधार घेऊन त्यांच्या जीवनावर हा काव्याचा कल्पना-पसारा माडला आहे. यांत फक्त नांवे इतिहासाला धरुन आहेत.

डॉ. गो. पं. कुळकर्णी यांनी माझा व काव्याचा परिचय करुन दिला आहे समीक्षणांत त्यांनीं गुणदोषांचा उत्तम आविष्कार केला आहे. त्यांचे ऋण फेडणे अशक्य आहे. तें तसेच शिरावर घेऊन मी त्यांचे व श्रीः वैजनाथ सुतवणी या नामवंत चित्रकाराचे गौतम बुद्धाचे यथार्थ चित्र रंगवून या काव्यकृतीला शोभा आणली आहें त्यांचें मन:पूर्वक आभार मानतो.

तसेच श्री. शंभूमाथ कहाळेकर व सौ. सुनिता कहाळेकर या दोघांचे आपुलकीने या कविता संग्रहास योग्य साह्य केल्यामुळे मी आभारी आहे.

ह. रा. इनामदार

# अनुक्रम :


गौतमबुद्ध : १ ते २८

**इतर कविता**

परडी : २९

वसंत : ३०

विश्व : ३२

मनोरथ : ३२

पणती : ३३

मनोगत : ३४

प्रतिभासाधन : ३४

शोध : ३५

अमृत : ३५

सार : ३६

सौंदर्याचे चित्र : ३७

खुलासा : ३८

माती : ३९

मोटर : ४०

नमन : ४१

जाणीव : ४१

खंत : ४२

धन्यता : ४२



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५४९८
२५९६६
दा. क्र.
काव्य ३०१९२८६
(स्थळ प्रत)

पौरुष : ४३
दुःख : ४४
भग्न हृदय : ४४
प्यास : ४५
कोडे : ४५
विषमता : ४६
काळ : ४६
किमया : ४७

## मुद्रण दोष

| पान क्र. | ओळ | दोष | शुद्धी |
|---|---|---|---|
| १८ | १५ वी | धृडसा | दृढसा |
| २६ | १० | बालती | बोलती |
| २७ | १४ | खळी | खुळी |
| ३१ | २ | अचूळ | अचूक |
| ४१ | १ | पयोधराल | पयोधराला |

# -: प्रस्तावना :-

विविधता ही विश्वाची विशेषता आहे. सौंदर्य आस्वादनात सुद्धा विविधता आढळते. सौंदर्यास्वाद एक सापेक्ष प्रक्रिया आहे. आणि त्यातही काव्यास्वादन विरळ्या मनाचा विरंगुळा आहे. कवी इनामदार यांच्या कवितेचा आस्वाद घेताना हे तीव्रतेने जाणवते. अशी कविता करणारे आणि वाचणारे क्वचितच आढळतात. आजच्या प्रचलित नवकाव्याच्या पार्श्वभूमीवर इनामदारांची कविता अगदी निराळीच पण उठून दिसते. मजूर स्त्रियांच्या मोर्च्यात चुकून आनंदीबाई पेशवे दिसावी तशी निराळी दिसते. आज लोकमान्य असलेल्या वास्तवाहून निराळी. चाल, ढब, पेहराव सर्वच बाबतीत नखरेल, सजवलेली अशी. प्रतिभा विलासापेक्षा पांडित्याची मोहिम असलेली, भावबहराबरोबरच चमत्कृतीचा हव्यास असलेली आणि प्रगल्भता, सुष्ढुस्वरुप, वैचित्र्य व प्रौढीने भारलेली अशी ही कविता आहे. हे वेगळेपण परंपरेला फुटलेल्या नव्या कोंभासारखे एकाकी आहे. आपण आपल्या आंगणात आवर्जून बाग लावावी, बदलत्या आवडी निवडी नुसार त्यात फुलझाडे लावावीत, बाग अगदी अद्ययावत करावी अन् अशा बागेत अचानक एक चमत्कार दिसावा, मूळासकट छाटून टाकलेल्या जास्वंदीच्या शुष्क खोडाला

नवी पालवी फुटावी, एकच फांदी डेरेदार होऊन वर सरकावी अन् तिला एखाद शेंदरी फुल दिसावं तशी हीं इनामदारांची कविता 'सर्वांहुनी निराळी, जी एकलीच रंगे' अशा स्वरुपाची कविता आहे.

'गौतमबुद्ध' ही कवीं इनामदारांची रचना पंडिती वळणाची आख्यानक काव्यसदृश रचना आहे. यांत कथांकाव्याचो कांही वैशिष्टचे दिसतात. रघुनाथ पंडितांच्या 'नळ दमयंती' आख्यानाचा प्रभाव दिसतो. परिश्रमपूर्वक साधलेली सौंदर्य पोषक संपन्नता दिसून येते. काव्यगुणमंडित रुपबंधामुळेच ही वाचनीय झाली आहे. अन्यथा विषयांत नाविन्य आढळत नाही. छदबद्धता, नाटचमयता, प्राचीन मराठी शद्ववैभव, उत्कट भावमयता, कल्पनाचातुर्य इत्यादी गुणांचा समुच्चय यात जरी दिसून आला तरी विषय नाविन्य यात नाही. यातील नीतीबोध कांही ठिकाणी अगदी शालेय स्वरुपाचा वाटतो. उदा. देवदत्ताने बाण मारुन घायाळ केलेल्या पक्षाला उचलून घेऊन गौतमाने व्यक्त केलेले विचार 'अतिशय खलकर्मा कोण वानील सांग, गणिति सुजन सारे त्याजला क्रूर मांग' (२५) किंवा पुढे गौतमाने गुंफलेल्या बोधगाथेचे स्पष्टीकरण करताना 'जात पात रुढी मोडुन काढा, स्नेहपात्र करी उत्तम काढा! (९१) सदाचार सद्भाव पवित्र वृत्ती जाणीजे थोर भक्ती इत्यादी उपदेशपर वाक्ये सामान्य वाटतात. या ऐवजी बुद्धाने पंचभिक्षूना सांगितलेला अष्टसहिता मार्ग मांडला असता तर अधिक चांगला परिणाम झाला असता.

कवी इनामदारांची प्रस्तुत रचना विषयनिष्ठ स्वरुपाची आहे. कल्पना वैभव भावतरल होऊन यांत अवतरले आहे. यांत विचार मांडण्यापेक्षा कांहीतरी सांगण्याचा हव्यास आहे. काव्यमय शैलीतील या बुद्ध चरित्रात इतिहासापेक्षा अन्वयाला महत्व दिले आहे. निवडक घटना घेऊन जनजीवनावर परिणाम करणाऱ्या तत्ववेत्त्याचे जीवन पुष्प उकलून दाखविले आहे. या प्रयत्नात कवी मनाची भावकलिका ही उत्तम उमलली आहे. आणि त्यातून अनेंक ठिकाणी भावसुगंध बहरलेला दिसतो. कांही ओळी मन वेधून घेतात. उदा. ‘ लचकत जणू लतिका वाटती कामशस्त्र ’ ‘ नखरा खरा न वाटे स्मरबाण भेदण्याला ! ’ मुखमणी झळके मृदुमानस रुप वर्णन, स्थलवर्णन या बरोबरच विवाहाचे प्रसंग वर्णंन ही इतके बहारदार झाले आहे की, त्यातून मध्य-कालीन प्रसंगचित्रे अगदी स्पष्ट डोळयासमोर उभी राहतात. चित्रमय शैलीतील प्रसंगवर्णन कवी मनातील सौंदर्यानुभूतीवर प्रकाश टाकणारे वठले आहे. (५३ ते ५७) पण अशी स्थाने या रचनेत अगदीच थोडी आहेत.

रचनाबंधाच्या दृष्टीने ही रचना नाखंडकाव्य, प्रबंधकाव्य किंवा गीत रामायणासारखी आकर्षक रचना नाही. ही आहे फक्त एक उत्तम गुंफलेली भावमालीका एकशे अकरा मण्यांची भाव मालिका संस्कृत साहि-त्यातील विदग्धतेचा परिणाम होऊन निर्माण झालेल्या पंडिती काव्याचा वारसा सांगणारी ही रचना आहे. यांत

कथानका पेक्षा कथ्याला, वृत्तवैचित्र्याला आणि अलंकाराला महत्व दिले आहे. परिणामतः ही रचना भाव सौंदर्यापेक्षा रचना सौंदर्याला शरण गेलेल्या प्रतिभेचा आविष्कार ठरते या रचनेत कथानकाच्या संदर्भात अल्पोक्तीने वावरणारी कविप्रतिभा वर्णनाच्या क्षेत्रात पल्लेदार वळणे घेऊन आपल्या रचना कौशल्याचे मोहन ठिकठिकाणी पेरताना दिसते. यात सोन्याचा कस मर्यादित वाटला तरी अलंकारणाची कारीगरी मन वेधून घेते.

कवी इमदारांच्या 'गौतमबुद्ध' रचनेत पारंपरिक प्राचीनमराठी कवितेचा झरा झिरपत आलेला आहे. संतांचा जिव्हाळा पंतांचे प्रबोधन आणि महंतांचा खडबडीतपणा यांत एकवटलेला दिसतो. गौतमाला वरण्यासाठी आलेल्या शतकन्यकांना त्यांच्या नखरेलपणामुळे शांब्रशल्य म्हणणाऱ्या या कविनी आपल्या कविता कामिनीला मात्र पूर्ण नखरेल बनवली आहे. ही कांही 'साधी सुरेख कन्या' (४०) लता नाही तर 'रंगेल दौलतीची उधळण पूर्ण व्हाया, की रंगपंचमीचा भरपूर स्वादघ्याया (५९) सिद्ध ठरेल अशी आहे. या कविताकामिनीच्या अंचलाचा शांत वारा सद्हृदयाच्या 'हृदयीं अग्नि चेतवी' असाच आहे. यांत 'कामकेलीं हा विसांवा, भावनांना पालवी (६१) अशी स्पष्टोक्तींपण आलेली आहे. यमक अनुप्रास साधण्यासाठी विचारांना मुरड घालणे व छंदोबद्धतेसाठीं शद्वांची जुळणी करणे अशी कृत्रिमता या रचनेत आहे पण सहज जुळून आलेली अलंकारिकता पाहण्यासारखी आहे.

**लचकत जणू लतिका वाटती कामशस्त्र**

**रचित रुचिर रांगा राजपुत्रा समोरी (३५)**

**प्रणयदंग भासले पंखिपंख बिलगले (५४)**

**करी लवणाचा खंड दुग्धनाश (८)**

**मळाबुध्दीचा फुलविला गुरुनी ! (१४)**

या व अशा अनेक ओळी रसिक मनाला भुरळ पाडणाऱ्या आहेत. ' मंदन लाजुनी खिन्न मनी म्हणे ! ' (३०) अशा प्रकारचे मानवी करण हीं वेधक झाले आहे. या रचनेत अनेक रचना सौंदर्याची उदाहरणे आहेत. ' शद्बावीण संभाषण ' (४४) हा विरोधा भास ज्ञानेश्वरांच्या ' शद्बेवीण संवादीजे ' ची आठवण करुन देणारा आहे.

कवी इनामदारांनी भाषा शद्धतेचा विचार मर्यादित स्वरुपाने केलेला दिसतो. रचनेची भाषा जरी संस्कृत प्रचुर परिमार्जित असली तरी नेहमीच्या बोलण्यातले ' बिलगलें ' सारखे शद्ब त्यात आहेत. तसेच जबाब, जवानी, मौज, बगीचा, नजर, नजरबंदी, भीतरी इत्यादी उर्दू प्रचलीत शद्बांचा वापरही या रचनेत झाला आहे. यांत पुनरुक्ती दोषही अनेक ठिकाणी आहेत. ' शद्बावीण संभाषण ' (४४) आणि ' शद्बवीण बोलुनी '(४७) अशी अगदी लागोपाठ तीच शद्बमाला आली आहे.

गौतमबुद्धाचे चरित्र आख्यान पद्धतीने लिहिण्याचा हा पहिलाच प्रयत्न दिसतो. 'गीत गौतम' ऐकले सुद्धा आहे. त्या रचनेत आणि या आख्यान रचनेत फारच अंतर आहे. यांत विदग्धतेला महत्व दिले. चरित्रातील बारकावे उलगडून सांगण्यापेक्षा त्याचे नुसतें वरवरचे वर्णन यांत आले आहें. बुद्धचरित्रातून प्रेरणाघ्याव्यात असाच कवीचा कल्प आहे.

**नको स्पृश्य अस्पृश्य हा भेदलोकी,**
**असे सर्व राष्ट्रास कलंक हा की ! (९२)**
**उच्च नीच भाव, सुखाचा अभाव,**
**मनी क्षुद्रवृत्ती, जनाचा स्वभाव ! (९३)**
**खोटे अमिष दाविती खळ जगी त्या त्या वाव देऊ नका,**
**दुष्टाच्या सूचना भयानक गणा, त्याचा बळी व्हाल कां?**

असे भाष्य कविनी अनेक प्रसंगांत केलेले आहे. मूर्तीपूजेला व वर्णाश्रम परंपरेला विरोध करणारा बुद्धधर्म भारता बाहेर फोफावला पण शंकराचार्यांनंतर भारतात तो फारच मर्यादित झाला हा इनामदारांचा कल त्यांच्या दृष्टीने जरी खरा असला तरी बुद्धधर्माची पताका खालीं आलीं असा त्याचा अर्थ होत नाही. खुद्द इनामदारच एका ठिकाणी म्हणतात–

" या भारती आरती लोक गाती,
बुद्धावरी प्रीती विशुद्ध दाविती,
तत्वे तयाची हृदयात बाणली,
स्तूप स्वरुपे चिरकाल राहिली "

यावरुन बुद्धतत्वे त्यांना श्रेष्ठ वाटतात हे स्पष्ट होते. बुद्धानंतर हीं तत्वे पटवणारी परंपरा क्षीण होत गेली असेच त्यांना म्हणायचे आहे असे मला वाटते. बुद्ध तत्वज्ञानाची पताका अजूनही झळकत आहे व झळकत राहील. 'बुद्धतत्व मंजुषा लोकशाहीं बहरवी' (१११) या अंतिम श्लोकात त्यांचा मनोभाव व्यक्त झाला आहे. इनामदारांनी बुद्धचरित्राचा विचार आजच्या (त्यांच्या काळाच्या) संदर्भात केलेला आहे.

आजच्या समस्या डोळ्यापुढे ठेवल्यामुळे या रचनेत इतिहासवेत्या परिपक्व दृष्टीचा अभाव आहे हे स्पष्ट झाले आहें. ही रचना 'भावनावश' कवी मनाची विशिष्ट चरित्राबाबत व्यक्त झालेली कविकुशलतेने नटलेली प्रतिक्रिया मात्र दिसते. या रचनेने मराठी वाङ्‌मयात एक मोलाची भर घातलेली आहे. विस्मृतीच्या खोल गर्देत विरघळूं पाहणाऱ्या छंदोबद्ध रचनेचा एक नवा आविष्कार इनामदारांनी घडवला आहे. छंदबद्ध,

अलंकार प्रचुर, मोहक वर्णनात सुंदरशी कथा असलेल्या काव्यचषकाचा आस्वाद घेऊ इच्छिणाऱ्या रसिकांसाठी ही रचना आजच्या कवितेच्या संदर्भात 'ओयासिस' वाटावी अशीच आहे. कवी इनामदारांच्या या प्रयत्ना बद्दल मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो आणि त्यांचे हे काव्य अनेकांना स्फूर्तिदायक ठरो ही इच्छा व्यक्त करतो.

"सत्याः सन्तु यजमानस्य कामाः"

गुढीपाडवा,
शके १९०७ डोंबिवली,
दिनांक २२-३-८५

प्रा. डॉ. गो. पं. कुलकर्णी
१ तपस्या डोंबिवली (प.)

२५४९
काव्य

# चरितगौतम

शांतीचा पुतळा गुणा नच तुळा चातुर्य बुद्धिबळा
वार्धक्या मरणा स्वयेंच टळण्या शोधी पथा आगळा
प्राण्याच्या निढळा अनेक विकळा जाळावयची कळा
व्हावा मार्गची मोकळा कळवळा भोगी तपाच्या झळा ..१

कपिलवस्तु नगरांत भूप शोभे
नाम शुद्धोधन, पत्नी योग्य लाभे
दैवि नाही संतति संपदा ही
घोर चिंता चित्तास सदा दाही.. २

व्रते दान उद्यापना आचराया
सजे साध्वी मोदें उपासा वराया
तनू झीजवी यापरी नित्य नेमें
फुका जन्म स्त्रीचा अपत्या विणें...३

प्रयत्ने प्रभु पावतो पुण्यवंता
दया भूतमात्रीं त्यजावी अहंता
सदाचार सद्भाव पवित्र वृत्ती
अशी भावना जाणिजे थोर भक्ती....४

सुताची आकांक्षा सुफलित जहाली बघुनीया
मनी माता मोदे भरित निरखी गोडतनया
मुखी हांसे नाचे नयन दिसताती हिरकण्या
तनू गोरीगोरी शिशु धडपडे चंद्र धरण्या...५

शुभशकुन जहाले जन्मवेळी मुलाचे
उडुगण जणु गाई गोड अगांई वाचे
उपवनि सुमनाचा गंध गेला भरुन
परिमल पसरेही राजद्रोही छपून...६

राजाला पुत्र झाला म्हणुनि जनमनी वाटला तोष फार
दारोदारी उभाविति ध्वजा तोरणे हौस थोर
हत्तीपाठी बसुनी वितरली शर्करा सर्व लोका
आनंदाच्या मधुर सनया वाजताती विलोका....७

करी लवणाचा खंड दुग्धनाश
किंवा गरलाचा थेंब अमृतास
घडे अघटित की काळ घाली घाला
गुणी मातेचा अंत झणीं झाला...८

मरण काळी असे निकटी उभी
भगिनि प्रेमळशी दुरिता नभी
जवळ घेवुनी बालक सांसवा
वदत पाळिन या तव गौरवा...९

समाधान वाटे तिच्या अंतराला
मुखीं तेज ठाके दिसे अंतराला
जसा दीप जाता प्रकाशास देई
गती त्यापरी भासली दुःखदायी..१०

कालाची गति विस्मृति घडविते शोकाकुलानां जनीं
कर्माची मग जाण ही उपजवी सौख्यास संजिवनी
धर्माची धरि कांस ऐहिक सुखा स्वीकारुनी भूपती
झाला लोकहितार्थ तत्पर म्हणी दावी करोनी कृती...११

जेव्हा शैशव संपले निजसुता विद्यार्जना लावणे
कर्तव्यी च्युत तात होईल कसा ? हे काय हो सांगणें
बुद्धिवंत गुरु समस्त सगळे पाचारिले आदरे
विद्या सर्वही शास्त्र शस्त्र निपुणा मानोनि आराधिले . १२

परीपूर्ण सर्वज्ञ कला निधान
गणी सर्व शिष्यास पुत्रासमान
गुरुना नसावा ज्ञानाभिमान
सदा तृप्त चित्ति असावा प्रसन्न...१३

मळा बुद्धिचा फुलविला गुरुनी
कला विद्या त्या शिकविल्या तयानीं
धनुर्विद्या तलवार युद्धशास्त्र
सर्व दुष्टानां दंडण्यास पात्र...१४

वाणी चातुर्यखाणी सहज जमविले आणिले थोर ज्ञानी
तेंही मोदे वितरणी बघुनि बहुगुणी राजपुत्रा गणोनी
ध्यानी साधोनि विद्या निरलसमने विस्मयाते भरोनी
आशीर्वादात्मक शुभवचा वर्षिती भावनानी...१५

एके दिनी म्हणति शिक्षक सर्व शिष्या
द्यावी परीक्षा हृदयी सदिच्छा
शस्त्रास्त्र विद्या तिचि काय कक्षा
रेखांकिता असुनिया करणे स्वरक्षा....१६

नगर सकल सारे पहाताना परिक्षा
विजय सुमनमाला कवण कंठी ? प्रतिक्षा
नरमणि युवराजा खेचतानां जयश्री
जयजय जयकारे वर्षिती पुष्प वृष्टी..१७

देवदत्त स्वमनी दुखावला
कोपयुक्त खचला यश ना मला
सूड घेईन कधितरी याचा
राजपुत्र म्हणुनी जय याचा...१८

उत्कर्षांप्रति जात गौतम असा मात्सर्य जन्मे मनी
काकाचा सुत देवदत्त चिडला त्याच्या यशापाहुनी
क्रोधाग्नीं भडके मनी नृपसुता मानीत शत्रुपरी
कोणाचे बघता भले जळतसे तो जाणिजे मत्सरी..१९

नैपुण्य खेळामधी दाखविले
संतुष्ट केले गुरु धन्य झाले
आनंद त्यांचा हृदयी न मावे
पायां पडे गौतम नम्रभावे...२०

हरघडि हरदिवशी मत्सरीं मग्न झाला
नचसुचत काही शोधी पंथास घाला
निकटि नृपसुताच्या येवुनीया तयाला
विजनवनि शिकारीसाठी उद्युक्त केला..२१

त्याचे मानस साफ स्वच्छ गमले की गौतमालागुनी
आनंदे विनये चला म्हणतसे येतो सख्यासज्जुनी
खोटे आमिष दाविती खल जगीं त्या वाव देवू नका
दुष्टाच्या सुचना भयानक गणा त्यांचा बळीव्हाल का...२२

वृक्षी पक्षी लक्षी धनु ओढुनी सोडिला प्रखर बाण
जखमी झाला पडला भूमिवरती झणी विकल प्राण
गेला गौतम धावुनीं झडकरी अंकावरी धरुनि बसला
पुसली जखम दयेने जीवनशंका मनावरी ठसल्या..२३

म्या विंधिला पक्षी शिकार माझी
कांरे उगा घेवुनी बैसलासी
आहे खरा मालक मीच याचा
नाही तुला हक्क जरा तयाचा...२४

कठीण हृदय वाटे मारिशी व्यर्थ जीव
सदय मृदुल माझे त्यासकेले सजीव
अतिशय खलकर्मा कोण वानील सांग
गणिति सुजन सारे त्याजला क्रूर मांग.. २५

नको नीचा मजलागीं बोध कांही
तुझी ओळख मज होय ठायि ठायि
राजपुत्रा अभिमान तुज स्वताचा
राजवैभव कां मिरविसी फुकाचा...२६

नको क्षोभ दावू नको दुष्ट वागू
चला न्यायपीठां त्वरे न्याय मागू
तयाचा शब्द मानीन साचा
कशाला उगा कोप हो सत्यवाचा ....२७

केला निवाडा मग न्यायधिशे
जो जीववी जीव तो धन्य भासे
मारील प्राणीं उमजोनी क्रोधे
त्या हक्क नाही कसलेच साधे ..२८

येणे परी परिसता खवळे मनांत
उचंबळे कोप नसानसांत
संधी पुन्हा साधिन सूड घ्याया
केली प्रतिज्ञा मग त्या छळाया...२९

स्वरुप सुंदर तो अतिदेखणा
हळुच यौवन दावितसे खुणा
मदन लाजुनि खिन्न मनी म्हणे
फुकट वाटत अंगहिने जिणें....३०

कांती केतकी रंगली तनुवरी तारुण्य शोभा हसे
राजा मानसी तोषला म्हणतसे हा योग्य लग्ना असे
देशोदेशी नृपांस आस उपजे जावे नृपाच्या प्रती
कन्या आपण गौतमा विधियुते द्यावी मनी वांछीती....३१

आल्या सांगुन कन्यका बहुतशा त्या राजपुत्रा प्रती
राजाच्या मनि दीर्घ पेंच पडला द्यावी कुठे संमती
ज्ञानी मंत्री म्हणे 'स्वयंवधूपणा' लावा करोनी कृती
पुत्राने वरणें स्वताच नवरी त्याच्या पसंतिची ती....३२

राजाला पटला विचार पुरता संदेश धाडी नृपा
याव्या घेवुनी कन्यका रुपयुता माते करावी कृपा
कौशल्याकृतिच्या कला करवुनी आणा सर्व दावण्या
ज्यांचे कौतुक खास राजसदनी आनंद या पाहण्या...३३

जणूं चटक चांदण्या निरखिती नभी चंद्रमा
तशा नृपतिकन्यका रुपवती तया गौतमा
तमा न जनदृष्टीची धरुनि दाविती विभ्रमा
सकाम मन यौवनी विसरते जनाच्या दमा...३४

सहज नजर फेकी धीटसा राजपुत्र
लचकत जणु लतिका वाटती कामशस्त्र
बहुत करकलाच्या वस्तुना चित्तहारी
रचित रुचिर रांगा राजपुत्रा समोरी... ३५

कलाकुसर पाहुनी अतीव अश्चर्य सर्वामनी
तसे नृपति डोलती सकळ वस्तुनां देखुनी
मनी म्हणति आपुली स्वरुपसुंदर कन्यका
पसंत पडुदे मुलास आणि लाभुदे मान्यता....३६

कितिक सुंदर बालिक वृथा
निकटि येत तया कथिती कथा
मदिय हस्तकला तुज अर्पण
तनुलता तव पायी समर्पण ३७

परिसता विनती अती आदरे
वरिवरी हसणें नच आवरे
रुपखनि रमणी न भरे मनी
गुण गणीं बहुमोल रुपाहुनी.. ३८

शतकन्यका बघोनी शतशल्य अंतराला
नखरा खरा न वाटे स्मरबाण भेदण्याला
वदला पित्यास "ताता ह्या आवरा मुलींना
आभार मानुनीया द्यावा निरोप त्यांना".. ३९

साधी सुरेख कन्या मज आवडेल तात
कोणी असेल ध्यानी तिज आणवा सुखात
आज्ञापी भूप तेव्हां आपुल्या गुणी प्रधाना
गोपा नरेशकन्या ती एक राहिली ना . ४०

विनयवती वधूंची वानवा नाही येथ
शतयुवती नजरबंदी खेळ हा खेळतात
मजलसती कुमारी जन्मली ना जगांत
जन गणतिल सारे दोष आहे पणात ४१

नम्रता वरी विलोल बालिका
सस्मिता करी सुगंध मालिका
गौतमास रुचली विलोकता
यौवनी विकसते रसीकता . ४२

स्मितमुखी तरी लास्य लोभस
मुखमणी झळके मृदुमानस
लपविता मधुवचा अधरावरी
प्रणयचंचल मना जणु आवरी ...४३

नेत्रभरे पाहि त्वरे वदनचंद्रमा
मावेना मोद मनी बघुनी लालिमा
चित्ताला आकर्षी मदनमंजिरी
शद्बावीण संभाषण रंगले उरी ४४

तरुण हृदय विंधी नेत्रीचे पुष्पबाण
सहज रुचत चित्ता प्रीतिचे मर्म जाण
रसिक युवक मोदे मोहरे अंतरात
अजब प्रणयलीला लाभते यौवनांत.. ४५

कला कौशल्याने नयन दिपवाया नृपसुता
स्वहस्ते सामोरी करित रचना मोद भरिता
छबी राज्येशाची मखमलिवरी रेखिली दिसे
मृदु रेशीम धागे उमटवी मुखी तेज विलसे..४६

कंठी अर्पित माळ भाळ नमवी त्याच्या पदालागुनी
देई हासुनि संमती सहजची शद्वाविणे बोलुनी
राजा राजगुरुस वंदन करी मुहूर्त काढा झणी
प्रेमाच्या मधुबंधनी मधुरसा सेवो रसा चाखुनी ...४७

मोठा मंडप घातला सजविला नानाप्रकारे किती
हंड्या झुंबर लावले भरजरी वस्त्रेछता शोभती
मोत्याचे मनहारी तोरण झुले दारावरी सुंदर
केळी पर्णयुता प्रलोभन वरी त्यालोंबती लोंगर....४८

वाद्यें मंगल वाजती सुचविती मांगल्य आले गृहा
वैवाहिक विधी द्विजाग्निपुढती आनंद यावा स्पृहा
मंत्राच्या मधुरस्वरा वधुवरा संबोधिती तोषती
सारे मंगल अक्षता उधळिती आशीर्वचा वर्षती ४९

पक्वान्ने नानापरिची काचंनमय ताटावरती
घमधमाट त्यांचा पसरे लोकांच्या अवती भवती
वासावर प्रमुदित होती घासावर घेती घांस
संगीतात स्तवती प्रभुला मैफलचि रंगे खास...५०

नवा बांधला राजवाडा सुतास
जिथें सर्व सोयी कराया विलास
भवाची सुखें सर्व विकासवाया
दिलाचा बगीचा स्वभावे फुलावा...५१

मनोरंजना रंगमहाल शोभे
शृंगार चेष्टास निवांत लाभे
मना लोभवी मोहनी यौवनांत
विलासांत विघ्ने नसावी जगांत...५२

कारंजें रमणीय इंद्रधनुचा आभास निर्मितसे
आरामांत बसून मौज लुटणे नेत्रास लागे पिसें
उद्यानात लता तरूस कवळी आणि खुणावी जणू
कंठी अर्पुनिया करा प्रियकरा रोमांचवावी तनू...५३

विहंगवृंद रंगले तरुवरी विसावले
प्रणयदंग भासले पंखिपंख बिलगले
मयूर नाचती नभी जलद् जणु पातले
चकोर चंद्र देखता चकित चित्त जाहले..५४

प्रेमाने बसवी सुहास्यवदना वामांकि आनंदली
वेणीच्या वरुनी स्वहस्त फिरवी लावोनि वक्षस्थली
प्रेमाच्या रसभावना उमलवी चुंबी कपोलावरी
सेवाया सजला सुखें मधुपसा आमोद पद्मांतरी...५५

चित्त चोरिले कुणी सांग सखे दिलवरा
हा विरागी जीव कसा लोभला तुझ्याकरा
प्रीतिपात्र राजसे ओतप्रोत आणलें
लोभले अधीर ओठ प्राशनास भाळले.. ५६

एकांती रमता तियेस पुसता संसारी आनंद कां ?
प्रश्नाला दिधला जबाब हसुनी हसासवे हंसिका
राही का असुखी कधिच रमणी नाथा मनीं नादली
मायेची शिरिशाल घालित पती होवुनीया सावली...५७

सुखा त्यजुनी विषदविपिनी पदा प्रेमे चुरिनकांता
दिला दिल हा वचनवचनी पुऱ्या करणे विधिशपथा
पतीच्या पाठीशी राही जशी छाया तशी जाया
पती सर्वस्व पत्नीला संपदा आपदा येता...५८

रंगेल दौलतीची उधळण पूर्ण व्हाया
की रंगपंचमीचा भरपूर स्वाद घ्याया
उर्मी उरांत उठती स्मर-भाव पालवाया
रंगे अशी जवानी पौरुष्य जागवाया
अपवाद काय याला तो राजपुत्र व्हावा...५९

धर्म अर्थ काम या त्रिविध गुणा भीतरी
क्रमित काळ राजसूत तरी उदास अंतरी
विषय हा विषय काय ? काय तृप्तता नसे
प्रदिप्त अग्नि इंधने काम काम करीतसे...६०

अंचलाचा शांत वारा हृदयीं अग्नि चेतवी
कामकेली हा विसावा भावनाना पालवी
हादरे वैराग्य माझे दास झालो वासनाचा
प्रणय धागे बांधतातो मी न राहीलो स्वताचा ६१

रामाच्या स्पर्शाने शिला अहल्या जहाली साकार
रामाच्या स्पर्शाने गौतम विषयास देत आकार....६२

प्रसवते रजनी रविला जशी
प्रियसखी जननी बनली तशी
सुतमुखा बघता सुख लाभले
नभ तया अपुरे लघु वाटले....६३

तनुल तनु शिशुची मुर्ती देखोनि डोळा
उपजत वत्सलता वक्षी घेता जिव्हाळा
कर पद कोमलता स्पर्शिता प्रेमधागे
विणित विमल वसना वेद मातेस जागे...६४

शुद्धोधनाची मग राजधानी
गाई गुणाचा रसराग घानी
गोपावधूला नव नाव लाभे
यशोधरा गौतमपत्नी शोभे...६५

जोजवीत चिमणा छकुला गीत गाय माय
मिटुनी घेई डोळे आपुले विसावू दे काय
मध्यरात्री आनंदाची उर्मी थोपवेना
भूल पडली विसरुन गेले पुढिल भविष्याना
गोड कडू घटना घडवी नियति फिरत जाय
आकळे न मजला बाळा शोधिते उपाय
झोप घेई आनंदाने गीत गाय माय...६६

पतिजवळि नेई कौतुकाने शिशुला
हसत हसत बोले खेळवा या मुलाला
शशिवदन जरासे चुंबना द्या कपोला
अगदिच अविकारी घ्या करा कौतुकाला...६७

तूच कौतुकास करी तूच रमवि बालका
काय हट्ट हा तुझा सहज होय बोलका
नाशीवंत ही तनू विलय पंथ क्रमितसे
काय कौतुकास करु कळत ना तुला कसे...६८

मोहाची मज मोहनी न मळवो माझी विशुद्धा मती
लोभाची लव ना मनीं लहरही लाभावि या सद्‌गती
आशा आवडत्या अमूप असता त्या आखडाव्या अशा
संसारांत सदैव सौख्य वसते ही आस पाहो नशा...६९

कंटाळा जाळित या जीवना सखे
बंदीवान कारागृहि वाटते निके
प्रेम सदन भूत भवन भासते मला
लोहकडया जीवनास हाय जखडल्या...७०

भाग्याने वच फेकले उचलले पाऊल टाकी पुढें
झंझावात जणू उसळला पृथ्वी झुके त्या पुढे
झाला निश्चय दृडसा कठिनसा येवो कुणी आडवा
त्याला दूर करुन वाट धरणें हो तापदायी हवा...७१

पुढे जाता त्याला सहज दिसला वृद्ध इतका
शिरीं काष्टें होती वजन इतुके भार न तुका
जरा मानेलाही थरथर दिसे पाय न पडे
अडे जागोजागी मदत करण्या याचित पुढें...७२

म्हातारा याचितसे सांग ! मानसा
क्षीण गात्र कां व्हावा कष्टला असा
वृद्धपणीं बळ हटले उतरणीस आला
प्राणीमात्र सर्व जगीं येतिया स्थितीला... ७३

राम राम गर्जतसे थवा चालला
चौघांच्या खांद्यावरी देह पहुडला
सांग मना नेत कुठें माणसे किती
जरा मृत्यु, प्राण्याला जाळणे रिती..७४

ज्याला आकार आहे त्यास आहे विकार
धि:कारावे लयमय असे मानवाचे शरीर
मृत्युचें कार्य चाले हळुहळु पसरी वागुरा जरा ही
कंठी टाकित पाशा अदय असलो नाही माया जराही.. ७५

उदास मन जहाले उपजवी उरी खिन्नता
अपार करुणाभरे बघत राही निम्नता
दशा प्रखर दरिद्रता दर्शनिया कशी पाहवे
जगात मनुजास दुःख छळिते कोणा कसे पाहवे...७६

परतला नगरा धरी मौनता
नसुचे नरुचे वरी खिन्नता
जगत हे भरले तिमिरे खरे
नयन निश्चलसे बघता झरे...७७

करकटी निकटी वधू गोमटी
स्मित नसे निरखी पति हिंपुटी
मधुवचे वदली किति कोप हा
मज कडून घडे अपराध कां?...७८

अपराध तुझा नाही मी अपराधी असेन या जगतीं
नाही गणिली दुःखें दुर्दैवीजन कसे बसे जगती
माराच्या माराने अगतिक प्राणी असा चुके वाट
त्याला मारुन जगणे ! विद्वत्तेचा असे फुका थाट...७९

काळी कांबळी पांघरुन पहुडें पृथ्वी तिला जाग ना
मौका मौलिक मोकळा मिळतसे संधी दिसे साधण्या
सारी आभरणे भराभर त्यजी ठेवी पलंगावरी
पत्नी प्रेमळ गोड बाळ न बघे, बाहेर रस्ता धरी...८०

पर्यंकावरी पाहिली सकलही रत्नांकिता मंडना
तेव्हां मौक्तिक-मालिका उतरती नेत्रातुनी खंडना
शोकाच्या सगळचा दिशा विकलशा उद्विग्नता पातली
आक्रोशे स्मृति चाळवी गडबडा लोळे प्रिया भूतली...८१

विरागी वृत्तिची उपजत तुम्हा जाण असुनी
फुकां कां संसारी पडुनि मज गेला दुखवुनी
सती सारी दुःखे सहन करतेही ? पतिसवे
वियोगाने जाळी मृदुल हृदया कंपित भये...८२

माझे पापच आडवे निजसुखा थोपावया राहिले
प्रीतीची सगळी रया बिघडली मी एकटी जाहले
आता आश्रय ना अनाथ अगदी दुर्दैव खाया उठे
राही कां जनकाविणे ममशिशु विश्राम शोधी कुठें...८३

आहे बालक सान त्यावरी लळा वात्सल्य कां लोपले
पितृप्रेम विशाल लोक म्हणती ते कां असे आटले
मातेची ममता आणि धनिकता ताताविणे निष्फळ
घाता दैव सदैव घोर टपले जाळीत दुःखावल...८४

वनोवनी हिंडत हेतुशुन्य
जिथे तिथे स्वापद क्रूर वन्य
भ्रमंती करी भीति न स्पर्शी चित्ता
पदोपदी थांबतसे फरिष्ता....८५

क्षुधा तृषा पार पळोन गेल्या
तनूक्षीणता, भावना, मूक झाल्या
हटे प्रेम ना लोभ इच्छा निमाली
करी प्राणी चिंता प्रवृती उदेली...८६

तरुतळी बसला थकला अती
मनन चिंतन या गति कोणती
दिसत या धरतीवरी भिन्नता
मनुज जाति मधे न समानता...८७

विरागी बने कां असा राजपुत्र
तसे एक झाले तयाचें सुमित्र
वनी शोधिती भेटती धन्य होती
खऱ्या मित्र प्रेमास ते आचरिती.. ८८

वाणी गोड गुणी जनास रुचुनी ते चालती मागुती
ऐंकाया उपदेश वर्तन तसें दावू जनाच्या प्रती
संघाची करी स्थापना चतुरशा ज्ञानी जना घेवुनी
त्यागाच्या भगव्या पटा वरुनिया भिक्षू रहा होवुनी...८९

बोधगाथा गुंफिली गौतमानी
देत मित्राना प्रचारा म्हणोनी
उंची त्याची ही हिमनगा परीस
मित्र हाती सोपवी हा परीस...९०

बंधुभाव हृदयांत असावा
भेदभाव जनतेत नसावा
जात पात रुढी मोडुन काढा
स्नेहपात्र करीं उत्तम काढा ..९१

दया क्षमा शांती प्रचार व्हावा
अहिंसा जिथे रास्त अपूर्व ठेवा
नको स्पृश्य अस्पृश्य हा भेद लोकी
असे सर्व राष्ट्रास कलंक हा की ..९२

उच्चनीच भाव सुखाचा अभाव
मनी क्षुद्र वृत्ती जनाचा स्वभाव
किती भिन्न जातिमधी द्वेष झाली
कुणी ना कुणाचा सुखाशा निमाली ...९३

वर्णाश्रमाचा नको मागमूस
नको मूर्तिपूजा पुजावे जनास
नको वेदचारी बनावे विचारी
स्वता प्राणि मात्राचि दुःखे निवारी..९४

बुद्धबोध प्रिय संघटनेला
बुद्धधर्म म्हणती भिक्षू तयाला
पंच भिक्षुगणा निवडून घेई
गौतमे पढवीले लवलाही...९५

चिता चिता या शरिरास जाळी
बळी काळकाळास हा सर्व काळीं
बोधीतरुच्या तळी सिद्धि लाभे
सिद्धार्थ नावाची उपाधी लागे.. ९६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५४९
काव्य
शाखा (स्थळ प्रत)

देशा विदेशात प्रचार कार्या
ते धाडिले मान्य धरुन धैर्या
लंका जपान आणि चीन प्रांत
आकर्षिले करुनिया अनुयायी त्यांत...९७

जुन्या चालिरिती पुराणांतरीच्या
तसे चार वेदांतील संस्कृतीच्या
दिशा पुराण्या उजळुनी दावी
नवे कांहिनाहीं गमे ठायि ठायी...९८

संघधर्माच्या पताका अनेक
सर्वभागीं फडकल्या कितीक
कुणा आकर्षी कुणा नापसंत
विवेकाची कोणास नसे खंत...९९

श्री शंकराचार्य पुढे रिघाले
वेदास रक्षावया सिद्ध झाले
लोकांस अज्ञान विमुक्त केले
चिंतामणी तेज असे निराळे...१००

वेदांची महती जना पटविती आचार्य या भारती
वर्षी माहिती न मिळते धार्मिक ग्रंथाकृती
शास्त्रें सर्व चमत्कृति चमकती विज्ञान विश्वामधी
सांगोपांग सविस्तर कथी सुक्ते विचारोदधीं...१०१

बुद्धाची नवधर्म धारक पताका पातली खालती
आचार्यांची पहा नभी फडफडे सत्याकृती बोलती
लोकांची हृदये सुबोध पियूषें त्या लाभले जीवन
वेदाचार विचार होत विजयी हो लुप्त मी तू पण...१०२

विदेशी धरी मूळ हा बुद्धधर्म
स्वदेशी तयाचे असें स्वल्प कर्म
जना आकळें हे तयांतील वर्म
असा होय आघात छेदित मर्म...१०३

शिष्य शिष्यिणी भ्रष्टदशा वरी
चक्षु लक्षुनी कष्ट दशा वरी
लक्ष्य भक्ष्य वदनी कदा पडे
निखळ स्वार्थ दिनिदिनी जडे...१०४

पुत्र भिक्षू आणि पत्नी भिक्षुणी
जाहली जवळ राहती येवुनी
भिक्षु भिक्षुणी धर्म वरावया
बुद्धपाद धरिती करुणामय...१०५

बुद्धाच्या शकटाची खीळ निखळे जाई कसा तो पुढें
स्वार्थाची भरती कुणी न निवटी पाऊल मागे पडें
तत्वांचा निरुपाय होय अगदी चाले अपाया पथा
स्वप्रांती अवहेलना विसतसे चित्तास लाग व्यथा...१०६

त्या काळीं सगळी विनाश धरिती राज्यावलीं भूतळी
बुद्धाचा नवधर्म मानुनि मुदे चाले अहिंसा खुळी
शाठ्यं हेच शठास युक्त असतारीती तया ना कळे
शत्रूला तृण दंती आणिन अशी शक्ती पहा मावळे...१०७

शोकांतिका जीवन नाट्य संपले
प्राणांतिके गौतमध्येय भंगले
आश्वासने स्वशन कार्य विरामले
ज्ञानी नेत्र असता भरले जलें...१०८

लेणी कोरुन ठेविली चढविली लेणीं जणू भूमीला
सौंदर्ये नटवून भूषणतती लेवावया लावल्या
भिक्षू भिक्षुणी राबुनी निशिदिनी सत्कार्य केले जरी
देती दूषण त्यांस म्हणती ही भूषणे साजिरी...१०९

या भारती आरती लोक गाती
बुद्धावरी प्रीति विशुद्ध दाविती
तत्वे तयाची हृदयांत बाणली
स्तूपस्वरुपे चिरकाल राहिली...११०

बुद्धतत्व मंजुषा लोकशाही बहरवी
आजही जगीं तीस सुज्ञलोक गौरवी
स्पृश्य अस्पृश्यता भेदभाव लोपला
देशमस्तकी खरा कोहिनूर शोभला..१११

# इतर कविता

# परडी

ही भरली परडी नानाविध पुष्पानी
तुज रिझवायाला रसिका आनंदोनी
हा चंपक आणि जाइ जुई मोगरा
प्राजक्त मनोहर शेवंतीचा नखरा
कोरांटी पिवळी लाल भडक जास्वंद
जरी गंध नसे तरी डोळ्याना आनंद
रम्य ही सदाफुली शुभ्र पांढरा तगरा
हा इंद्रधनुचा गुलाब दावित तोरा
ठेविली समोरी बकुल फुलाची माला
जरी सुकून जाता परिमल देईल गहिरा
घें वेचुनी यांतील फूल तुला आवडते
मज विषाद नाही जें आवडले तुज घे तें

☆

# वसंत

हिरवी चादर रानफुले वर
अंथरली ही धरणी सुंदर
कोकिल गाइ सुस्वरपंचम
हळु हळु उघडी आपुले लोचन

मंदमंदशा समीर लहरी
हांसत फुलवी तरु वल्लरी
तुरे रेशमी हिरवे पिवळे
स्वागत सारे कुणा न कळले

सुगंध शिंपित दाही दिशाना
नव जीवन दे चराचराना
शिशीराचे दिन होते छोटे
कुणी बनविले त्याना मोठे

अपर्ण वृक्षा सपर्ण केले
फुटती त्याना नवे धुमारे
वधुसंशोधन करती डोंगर
कपडे हिरवे गार तनूवर

लाल फुलानीं गुलमोहर तर
सुमन पाकळ्या वर्षी भूवर

कर कोणाचे करती किमया
अचूक सजवी नदंनवन या
युवक युवतिना नवखी दुनिया
चौकट त्यजुनी घेतीं अनुभवा
प्रणय केलीचे भाव मनोहर
विसरुन जाती आपले प्रियघर
यौवन कलिका फुलती झरझर
मदन जाहला जणू मधुकर
फिरे भोवती करतो गुंजन
फुंकर घाली हळूच गुंगून
भाव उमलती उत्कट बहूवर
स्वर्ग सापडे त्याना भूवर
दिसता नसता आला आला
फुला फळानी बागा नटल्या
कुरुपता सौंदर्ये नटवी
नैराश्याला आशा हसवी
दुःखाला आनंद दाखवी
घोर तमाला प्रकाश खुलवी
होवू तल्लीन या आनंदी
विसरुन दु:खे गावू नांदी
जादू किमया कोणी केली
वसंत आला आलोस्वारी

☆

# विश्व

भावनाचे विश्व माझे उगवता उजळी रवी ।
बागशाही फुलुनी आली सौंदर्य भरले ठायिठायीं ।।
उडुगणाला कंठ फुटला गीत गाती आदरे ।
दहिवराचे थेंब झरती धरती मोदे थरथरे ।।
नटली काया कंटकानी आस मनिची तळमळें ।
जें हवे ते गूढ सारे ना कळें ती हळहळे ।।

☆

# मनोरथ

आकांक्षा अंतरंगीं बांधते इमले नवे
साध्य व्हावे साधनेने हे हवे, ते हवे
अष्टकोनी आखला हा जलाशय सुंदर
त्यात पद्मे डोलतातीं उडती कारंजी तुषार
पौर्णिमेचे चांदणे सुखवील नेत्रा चंद्रमा
अमृताचे थेंब झरती ना कशाची वानवा
बनविले उद्यान छोटे पुष्पलतिका शोभती
परिमळाने मंदवायु आल्हाद नाचे भोवती
हा मनोरथ द्रुतगतिनें दूर देशी चालला
उडवुनी धुरळाच मागें लोचनाना झोंबला

☆

# पणती

तेथे दूरवर आहे मिणमिणती पणती
नंदादीपासारखी, सारखी सतत तेवती
कधि मंद कधी सुसाट वाहतात वारे
ती फडफडते तडफडते उघडून मनाची दारे
तेल आहे तोंवर ती अशीच जळणार
पण कुणासाठी ? ती मुग्धा नाही सांगणार
जाणीव त्याची जागते गतकाळाची
पण कंठातील करमाला कशी काढायची
विचाराच्या लहरीवर तो वाहत जातो
पाउल उचलतो बळेच चालतो
ते अडखळते आणि स्वतांतच गुंतून जातो.

☆

# मनोगत

सोसू किती दुरावा
सहवास लाभ द्यावा
चित्तांत प्रीति नाचे
नाही जरा विसावा
रेखीत चित्र तूझे
स्मित रंगले मुखाला
लज्जेत न्हावूनीया
डोळे खुणावी मजला
पदरास चाळविशी
अधरास बंद केले
प्रद्युम्न मुदित होइ
हिंदोली घेइ झोले
कुलरीति आणि प्रीति
संघर्ष थांबवीला
तारुंण्य धीट झाले
आशा फुलूनी आल्या

☆

# प्रतिभासाधन

माझे मीपण गेलो विसरुन
ध्यास तुझा नित येतो बहरुन
शद्व भराभर धावती झरझर
शिडद्या रचाया मिळतो अवसर
त्यावर चढुनी लक्ष नभावर
फुले तेथली आणिन भूवर
वेडा म्हणतिल हासुन जनगण
घेतिल फिरकी समजुन उमजुन
पर्वा त्याची न करी कविमन
ध्येय एकची प्रतिभा साधन

☆

# शोध

अमृताचा शोध घ्यावा यौवनाच्या अंतरीं
गवसले ते लाल गाली गुलाब कलिकाभीतरी
सुरत लावण्य वीणा सारंग रागा छेडिता
वाट न कळे मन कुरंगा बुद्धिचा घट हो रिता
अंग हीना अनंगाचे कार्य साधी सहजता
जीव धाला तृप्त झाला ध्येय गाठी सत्वरी

☆

# अमृत

पातूळीं भरली तळींच सगळी या अमृताने किती
स्वर्गामाजीं विशाल वापी असती देवास आकर्षिती
चंद्राच्या शरिरांत पियूष असे वर्षीतसे भूतळी
पृथ्वीच्या वरी सागरा घुसळुनी आनंद देवावळी
सापांच्या मुखी धार अमृत असे निर्मी विषाच्या सरी
देवाच्या हृदयीं असूर भय कां होईल कीं तस्करी
पीयूषे परिपूर्ण चंद्र असता त्या राजयक्ष्मा छळी
आणि सागरी नाव रोज फिरता घेतो जनांचा बळी
शंका स्पर्शित मानवा अभय कां लाभें इथे जीवनी
ओठी प्रेयशिच्या पियूष भरले जीवास संजिविनी
या लोकी जरी मृत्युचे भय सदा प्राण्यास रात्रं दिनी
ओठाना सखीच्या पियूष भरले आश्चर्य वाटे मनी

☆

# सार

दीपकळीवर झेपावे हा पतंग वारंवार
नयनिं यमाचें जरि बावटें करी प्रेम अनिवार
कळ्या कळ्यांना घेति चुंबने सुंदर फुलपाखरे
रंग तयाचे मादक मोहक आकर्षण गहिरे
विषय सेवनी ओढ अनावर काया शिणवी जरी
निस्सीम निष्ठा नसे अंतरी स्वादो रस माधुरी
नभांगणी या तारे चमकती शोभा दावा कुठें
रम्य चंद्रमा अस्तंगतसा रात खावया उठे
स्निग्धयुक्तसा दीप दिसावा वात नसावी उरी
तिमिर भयाने जनास भीति उरीं टोचते सुरी
प्रेमसेवनी भक्ती नसता काय जीवनी सार
प्राणावाचूनी कुडी असावी फुका भूमिला भार

☆

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५९८९
काव्य/क्र. २५१९९
३-७१५४
शाखा (स्थळ प्रत)

# सौंदर्याचे चित्र

नगरांत युवक होता उत्कृष्ट चित्रकार
सौंदर्यचित्र कैसे रेखू करी विचार
　　काही सुचे न त्याला साकार रंगवावे
　　आकारहीन याला आता कसे करावे
करीं कुंचला धरोनी प्रतिभेस आळवीत
पुसणे कुणास न कळे येई सखी समीप
　　कां ? हो उदास दिसता केला सवाल त्याला
　　सौंदर्य रंगवावे चित्ती विचार आला
फुलवेल मंडपाला बिलगून हास्य दावी
आणि चंद्रिका शशीला खुलवित हो पहावी
　　रमणीस रंजवा या रसिकापरी बनून
　　अंकावरी मला घ्या हासून रंगवून
सौंदर्य चित्र काढा सखया असे झकास
आरास मीलनाची दावा कलाविकास

☆

# खुलासा

उकिरड्या वरी उडे कोंबडी
टिपते दाणे करते फडफड
कुठे घारीची उंच भरारी
कुठें हिची ही अरुंद धडपड
कामुकतेच्या डबक्या मधले
जंतू करती अखंड वळवळ
दिसतिल त्याना कधि न कसले
सरोवरांतील तरंग निर्मळ
घुंघुरटे हे घाणी वरचे
स्वादिल कां हो सुमन रसाला
उंबरातले जंतू म्हणती
स्वर्ग सांपडे येथे अम्हाला
मूढ मनाची मूर्ख बोलणी
थोर चालती आपुल्या मार्गे
भुंकुनि भुंकुनी हत्ताश होती
कचकड्याची क्षीण बाहुले
गोड बोलणे कृती नागडी
उदात्ततेचे सदा वावडे
उच्चपदाच्या नशेत नाचती
माजवितातो हीन उकिरडे

☆

# माती

भूतकाळाची धूळ झटकून
मातीवर टाकली चूळ
वर्तमानाची झूल पांघरुन
होता सुखांत मश्गूल

भविष्यांची स्वप्ने रंगवित
खात होतो मध नि गूळ
मी मलाच विसरलो
नाही समजली भूल

काळाची माळ चाळिता
विवेक झाला अनुकूल
दिमाखाची नुसतीच हूल
उगाच जपलो खूळ

मीच मीच माती
मीच माती मूळ

☆

# मोटर

दिसे ही चंचला इतकी
शरिरीं रम्य चपळाई
तुकतुकी सर्व अंगाला
देखणी नेत्र सुखदायी
मखमली गादी गिरद्यानी
धार्जिणी धनिक मान्याना
खेळती खेळवीति ते
मजेने षोक पुरवा या
रमावे आणि रमवावे
मनाची भूल ना भागे
विलासा येतसे भरती
जगीं लावण्य आकर्षी
हटे जों नूर कायेचा
जुन्याची जीर्णता दाही

☆

## नमन

तुजसी नमन हे राष्ट्रनिशाणा
स्वतंत्र्याच्या सौख्य निधाना ।। धृ ।।
मंद वायुवरी हालसी डोलसी
स्वाधीनतेचा दिमाख दाविसी
परचक्राला धाक निर्मिसी
देशभक्तीचे दास बनुनी दावा शूरपणा...... ।। १ ।।
लता जणु स्वतंत्रता वाढते
शिंपिता रुधिर पुष्पिता शोभते
सुगंधमय मख चारुता आणते
अनुभव असला संदेशाला देसी देशाना...... ।।२।।

☆

## जाणीव

अंबरातल्या पयोधराला
पाहुनी नाचसी मोरा
रम्य पिसारा उभवुनी बघसी
उगाच दाविसी तोरा
अलभ्यवाटे मनांत तरीही
उगाच कां रे धडपडसी
फशी पाडशील खुळचा जीवाला
लाज तुला ना कशी
उनाड वारा रगडील त्याला
चर्चुनी चदंन उठी
तृषार्त वसशील वाट पहाता
झाक नेत्र निजपटी

☆

## खंत

डोळ्याच्या डोहात लाटा उसळती
तुषार उडोनी मोती ओघळती
माळेत माळिले नाही त्याना मिती
ओढताना माळ भाव आंदोळती
अंतरी चालला संग्राम घनघोर
विवेकाचा गळा घोटतो विकार
मुक्या भावनांना सुखाची झालर
वाट पाहू कितीं काळ अगोचर
प्रकाशदर्शन दिसावे तमांत
प्रतिक्षा परीक्षा मनामधे खंत.

☆

## धन्यता

वळोनी चारदा मागे
कशाला पाहसी बाळे
गुलाबी प्रीतिची जादू
तुझ्या गालावरी खेळे
जरासा मार्ग क्रमताना
अशी कां थांबसी बोल
अडविसी शब्द ओठात
मिटुनिया पापण्या लोल
अंतरी प्रीति कल्लोळ
कशाला होसी घायाळ
तुझें मौनत्व मोलाचे
अमृताचा मुखी साठा
कळाला बाहणा सारा
जीवाला धन्य तू केले.

☆

# पौरुष्य

लाखांत देखणी लावण्याचीं खाण
त्या गुलाब कुसुमा तुझ्या रुपाची वाण
रक्षिते तयाला कुंपण कंटकमय ते
भक्षितो भयंकर कोप तुझा प्रेमाते
नयनात मृगाचे नेत्रही लख लख करती
वदनांत चंद्रमा सहजची दावी वसती
तनुवरी केतकीं कांती शोभा नटवी
हिरकण्या चमकती, गुलाब कलिका सजवी
परिमले गंध तव यौवन पुष्पा मधुनी
कां उगाच रुससी कटु वचने रागानी
दिसतेस मनोहर कोपमग्न तू असता
छळतेस उगा का रसिक पतिला नुसता
रुसतेस फुका तुज हवे काय ते बोल
समजावू कैसे शब्दचि बनती फोल
संसारी अघटित सुख-दुःखाच्या घटना
त्या अनुभवताना मोद विषादा खळना
अग्नित टाकता कांचन उजळून निघते
सौंदर्य रक्षणी सुज्ञ पतिला खबरदारी आवडते
मज अंकित समजुनी हटुनी राहसी दूर
हे पौरुष्य पूर्ण तन लाविल पंचम सूर

卐

## दुःख

माझ्या नाजुक फुला
कां उगा लाविसी लळा
मायेमध्ये गोविसी कां रे गळा
फुलविसी आनंदाचा मळा
हा वठलासे जुनाट झाला तरु
वात्सल्य लागले नेत्रावाटें झरु
ही मिठी गळयाला हात नको हे धरु
करपाश सोडरे पाश यमाचा गळा.

卐

## भग्न हृदय

वेदना आक्रोश करती
परिसताना हुंदके
आसवांचा उदधी खवळे
अंतराला हाचके
अंतरंगी आग भडके
उसळती ज्वाला वरी
अश्रूंचें आधाण उकळे
वाफ झाली बोलती
भूत काळा भस्म करणे
मार्ग तुजला मोकळा
वर्तमानी वर्तणे हे
बुद्धिवंताची कला
या कलेने कलह करणे !
भग्न झाले हृदय इतके.

卐

## प्यास

एकांत पसरवी सुगंध मधुपुष्पांचा
अंधार कवडसे फेकितसे नयनाचा
निःशब्द शांतता गोड वचाने बोले
चांदणे अंतरी चमचम करुनी डोले
चांदवा नभाचा लपला मेघामधुनी
मुखचंद्र उदेला अंबरास बिलगोनी
चांदणें रुपेरी वर्षी सुधेच्या धारा
कुमुदिनी विकसल्या प्यास शमे मधुपाचा.

卐

## कोडे

उदधीचे बळ ना टिटवीला समजे
नभ विशालताही गरुडाला ना उमजे
गंधाची गुढता ही उकलील कसे हे फूल
जल पृथःकरणा करील तृषा ही भूल
नाकाशी नाते सुगंध दाविल रोज
जो गरजू आहे तृप्तीची त्या गरज.

卐

## विषमता

जेथे रुप आहे तेथे रंग नाही
जेथे सूर आहे तेथे रुप नाही
जेथे रंग आहे तेथे सूर नाही
रंग रुप आहे तेथे सूर नाही.

卐

## काळ

दर्या उसळला
वारा पिंगाघालू लागला
धरतीने अंधार पांघरला
तरु तरु हेलकांडला
रात किड्याचा आक्रोश
चांदण्या झाल्या बेहोष
आभाळाले फुटले कोड
आसवांची त्यात जोड
पहारा पडला ढिला
काळाचा वाजला टोला.

卐

# किमया

बाल्यत्व संपले आता प्रांत निराळा
कळ्या उमलल्या मंद वायूने हळु हसू लागल्या
लोभवी जीवा त्या फुलवी मोहक फुला
परिमळीं गुंतला सहज धुंद जाहला
आकांक्षा उपजें शोधित राही कुणाला
कुणी निकटी येंता आकर्षित करी त्याला
मोहाची सुमने नटली एकवटोनी
कर कंठी पडले अवचित दिसली किमया

卐

REFBK-0025196
REFBK-0025196